## पुस्तक ओळख

**नीळकंठ गोपाळ मेंढे**

मु.वरूड, जि.अमरावती
दू. ०७२२९-२३३४८८

# तुळशीराम काजेंची चिंतनशील कविता

कविवर्य तुळशीराम काजे यांचा ‘काहूरभैरवी’ हा तिसरा काव्यसंग्रह मे २००७ मध्ये प्रकाशित झाला. त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९५८ मध्ये कवी अनिल यांच्या हस्ते मालवण येथे ४० व्या मराठी साहित्य संमेलनात प्रकाशित झाला असून त्यास कुसुमावती देशपांडे यांची अल्प पण मर्मग्राही प्रस्तावना लाभली आहे. ‘भ्रमिष्टाचे शोकगीत’ (मौज, १९८३) ला राज्य शासनाचा कवी केशवसुत पुरस्कार लाभला. प्रस्तुत संग्रहात ६७ कवितांचा समावेश आहे.

ग्रेस, चित्रे, मधुकर केचे, उद्धव शेळके, मनोहर तऱ्हाट, उ.रा.गिरी इ. समकालीन साहित्यिकांच्या सोबत तुळशीराम काजेंची काव्यनिर्मिती सुरू होती. काजे हे नवकवितेच्या दुसऱ्या पिढीतील शेवटचे कवी आहेत. अल्प पण गुणात्मक काव्यनिर्मिती हे त्यांच्या कवितेचं वैशिष्ट्य आहे. ‘जिवंत जाणीव आणि स्वतंत्र अभिव्यक्ती याची साक्ष पटण्याजोगी अनेक उदाहरणे’ त्यांच्या गद्धेपंचविशीतील काव्यसंग्रहातही असल्याची खात्री कुसुमावती देशपांडेंनी दिली आहे.

सामाजिक जाणिवेबरोबरच आत्मनिष्ठ जाणिवांच्या कवितातून सभोवतीच्या सामाजिक पर्यावरणात स्वतःचे अगतिक होणे, अहंभावाच्या जाणिवेने मानवी सत्वच नष्ट होणे, आपल्या कर्माची फळे भोगण्यासाठीचे आत्मसांत्वन करणे, एकटेपणावरील विश्वास आणि विपरित परिस्थितीत जगण्याचे प्रेरक तत्त्व स्वीकारण्याचे आवाहन ही कविता करते. ‘घावावर पडती घाव/ अंतराळात दृष्टी लाव/खोबऱ्यासारखे हृदय कीस’ असा आत्मसंवाद ते करू शकले असले तरी ‘सात सक्कं त्रेचाळीस’ असा विपरित परिणाम नाकारता येत नाही याची त्यांना जाणीव आहे. *‘उलटे तिढे, म्हण पाढे/ रात्रीपुरते श्रृंगारमढे / उघडे डोळे सागरगोट्या / बरगड्यांवर षंढ कवट्या’* (भाग्यवंत, पृ. ३९) जगण्याच्या रीतीचा विपरित परिणाम अनुभवास येऊनही जगणे टाळता येत नाही, हे सत्य आहे. म्हणून, *‘पाऊल पाऊल पुढेच टाक/आहेस खरा भाग्यवंत/ओझ्यासहीत खाली*

*वाक!'* या उपरोधिक सुरामध्ये करुणा आहे, जगण्यावरची निष्ठा आहे.

'काही', 'कवडसा', 'याचसाठी', 'कुणी एक', 'कोलांटउडी', 'नाव', 'वैतागवणवा', 'हे अंतरात्म्या', 'सर्पसत्र' व 'योगक्षेम' या कवितांमधील जाणीवही आत्मचिंतनाच्या रूपाने अविष्कृत होते. आयुष्यात समर्पणशील राहूनही - *'एका उघड्या दाराशी/रक्त वाहू दिले थोडे/ घोटभर पाण्यासाठी/केले कातडीचे जोडे'*, असा जेव्हा अनुभव येतो तेव्हा तो हृदय पिळवटून टाकणारा असतो; आणि मग आशेचे बुरूज ढासळू लागतात. कधीकधी ते संताच्या स्थितप्रज्ञ व निरामय हृदयानेही (*जळे रक्त मास/ फक्त बाकी/कोरडे नि:श्वास*) जीवनाकडे पाहतात. 'कुणी एक' या कवितेमध्ये कथात्मबंधातून ख्रिस्तासारखा विराट प्रज्ञेचा माणूस कवीने उभा केला आहे. माणूसपणाच्या जपणुकीसाठी समर्पणशीलपणे (*घास घासून चंदन / टिळा कपाळी ठोकला*) जगणारा व मानवी जगरहाटीचे सम्यक आकलन झालेला महात्मा हे कवीचे आदर्शवादी स्वप्न असावे. - 'तोही कसा बिलंदर/नाही आरडाओरडा/ घट्ट मिटल्या ओठांनी/फिका हासला कोरडा' (कुणी एक, पृ. ६७) असे मूल्यवान जाणिवेचे आविष्करण आवाहन - संप्रेषणाच्या दृष्टीनेही सकस उतरले आहे. *'नाव'* ही कविताही कवीच्या मनातील मूल्यात्म भाव अधोरेखित करते. आपली स्वप्ने घेऊन कवी ज्या गावात येतो ते *'गर्दगार झाडी/हिरवेसे गाव/जर्द निळे तळे'*, असे स्वप्नसुंदर असते. कवीच्या स्वप्नातले हे 'हिरवेसे गाव' शेवटी जेव्हा 'काळपट झाडी/काजव्याचे गाव' या रूपात रूपांतरित होत गेले असले तरी त्यांच्या मनाच्या अवकाशात 'शुभ्र नाव' ठाण मांडून असते. सभोवतीचे अमानवीय भीषण पर्यावरण, अपमान, नाकारलेपण, अगतिकता त्याला व्यापून असते. *'खरे तर लोकशाहीत जपावी, प्रत्येकाने आपापली संस्कृती'* पण इथे तर *'बंधुप्रेमाची स्तोत्रे गाणारी माणसेच'* माणसांना जिवंत जाळतात. कविमनात जो वैतागवणवा धगधगत असतो त्याचे स्वरूप असे आहे - *'दिस : काळजात काचा/रात्र : मुकी बंद वाचा/मन : तेजाब जळते/तन : ढगाळ लोंबते'* (वैतागवणवा, पृ. ७१)

बुद्ध करुणेचे बीज उगवलेल्या या भूमीत असे का व्हावे हा प्रश्न त्यांना अस्वस्थ करतो. *'स्वप्नवास्तवाच्या मधल्या दरीत कशी मारू कोलांटउडी?'* या प्रश्नाला उत्तर नसते. मग *'अपार अथांग/वेदनेचे पात्र/का न व्हावे येथे/पुन्हा सर्पसत्र'* हे परिवर्तननिष्ठ विद्रोही आवाहन यथार्थ वाटू लागते. कवीच्या या आत्मसंवादाचे स्वरूप 'आपुलाची वाद आपणासी' असे जरी असले तरी कवीच्या अंतरात्म्यात खदखदत असलेला हा अवरुद्ध आवाज व आक्रोश व्यापक 'मी'चा प्रतिनिधी असतो. त्यांच्या अबोल, शांत व ग्रामीण सुसंस्कारित व्यक्तिमत्वाच्या खुणा त्यांच्या आत्मनिष्ठ कवितेतही जाणवतात.

आत्मिक दुरावस्थेला पोहचल्यावर 'उरलो एकटा' व 'बधिरला मेंदू' अशी जाणीव तीव्र झाल्यावर *'पंढरीचा राणा/भेटवा हो'* अशी ईश्वरभेटीची जाणीव कवीला अस्वस्थ करते. पुढे वास्तवाच्या भीषण रेट्यात *'दह्यादुधात न्हाणता/देव झाला गोटा'* हे सत्य नाकारता येत नाही. *'उंबरठ्यावरी/आपटले डोके/मिळाले भातुके/वेदनेचे'* इ. ईश्वरविषयक अनुभवांचे स्थर 'भेटवा हो', 'शिगोशिग', 'कंठशोष', 'ध्रुवदिशे' इ. कवितेत येतात, तेही त्यांच्या आत्मनिष्ठ कवितेचे पदर होत.

'नाते', 'सूर', 'अथांग', 'वसा', 'कृष्णठेवा' आणि 'काहूरभैरवी' या कवितांमधील मूल्यचिंतन हा काजेंच्या कवितेचा पैलू अत्यंत हृद्य आहे. कधी इथे मरणभय नाही तर त्याच्या आगमनाचे स्वागत आहे तर कधी मृत्यूच्या येण्याची चिंतातुर जाणीवही आहे. मस्तीत जगता जगता कातिनीची मान जशी नकळत जाळ्यात अडकते तसे जीवन संपते. जगण्यातील चैतन्याला मरणाचा शाप आहे; म्हणून *'कोण लावीतसे/जडाची साल/चैतन्यपिंपळा'* असा कवीला प्रश्न पडतो; तर दुसरीकडे जिवा-शिवाच्या ऐक्याची जाणीवही आहे. मृत्यू हा देखील या देहरूपी पार्थिवाच्या पलिकडील चैतन्यच आहे म्हणून मृत्यूचे आगमन रतिरात्रीच्या उत्सवासारखे वाटणे, हा या चिंतनाचाच भाग आहे. त्या उत्कट आनंदाची प्रतीती दैहिक संज्ञेत चैतन्यमय होतानाची अनुभूती कवीने आपल्या शब्दात अशी पकडली आहे. *'नाभी ना कस्तुरी/पण ओसंडला गंध/कळलेच नाही/झाड फुलले संबंध'* (सूर, पृ. १०)

जीवनातील सुखदु:खाच्या जाणिवेचा अंत व मृत्यूचे स्वागत हा पर्वकाळ कवी 'उभा शहारून डोले' अशा उत्कट आनंदाच्या रूपात करतो. जेव्हा हळूहळू मृत्यूचे सावट या दैहिक चैतन्यावर पसरू लागते ती अनुभूती (पसरता धुके/दूर झाले गात्र मुके/फुलकेशरात/भैरवीचा सूर दुखे) कवीने साक्षाताच्या पातळीवर उभी केली आहे. जगण्यातली व्यर्थता 'वसा' या कवितेतही मोठ्या समर्थपणे अविष्कृत झाली आहे. आपण आपले उभे आयुष्य जगत जातो, पण हवा तसा आत्मसंवाद असा कितीसा होतो? असे क्वचित येणारे प्रसंग कवीने प्राणपणाने जपले आहेत. शेवटी जगणे म्हणजे तरी काय? तर, असा एखादा प्राणपणाने घेतलेला वसा जपत जपत या विश्वपोकळीत संपून जाणे होय. 'काहूरभैरवी' या कवितेत तर ही जाणीव अधिक गडद झाली आहे.

'डोळे', 'गंगार्पण', 'बागेश्री', 'गुलाब', 'भावभक्ती', 'उर्वरित', 'श्रृती' या कवितांमधून 'मी-तू' संबंध अविष्कृत झाले आहेत. त्याच दृष्टीने या कवितांची शीर्षकेही बोलकी आहेत. प्रेमविषयक साफल्य-वैफल्य, गतस्मृतीच्या उजाळ्यातून भरून आलेलं कारुण्य, व रम्योदात्ततेची व्यामिश्र रूपे मोठ्या उत्कटतेने या कवितेत अविष्कृत होतात. 'डोळे' या कवितेत निसर्गप्रतिमांद्वारे ते आपल्या प्रियेच्या स्मृतीला उजाळा देतात. प्रियेच्या व्यक्तिमत्वातील सुकुमार कोवळीक व सभोवतालचे शुष्क समाजवास्तव या पार्श्वभूमीवरील स्मृतिरूप (*दोन थेंब चंद्रसावळे/तिचे तर नसतील/ते विसराळू डोळे)* चैतन्य आणि कवितेच्या देहरूपात आलेली मूर्त-अमूर्ताची सरमिसळ मोठी विलोभनीय वाटते. त्यामुळेच त्यांची पुष्कळशी कविता नवनवोन्मेषशालिनी उतरली आहे. 'गंगार्पण'मध्ये वृद्धापकाळाच्या आवरासावरीचे मोठे सहृदय व संयतशील दर्शन घडते. *'जुने व्रण ठणकता/ पांघरावे गाणे'* आणि *'स्वर मनी सलणारे/करू गंगार्पण'* या ओळींमधील चिंतनशील संयत स्वर हा तर काजेंच्या व्यक्तित्वातील संस्काराचाच भाग आहे. 'भावभक्ती'मध्ये प्रियेप्रती संपूर्ण समर्पणभाव आह. तिच्या सहवासाने, त्यातील प्रेमभावाने जगण्याचे सोने झाल्याची जाणीव उभयपक्षी आनंददायी (*लाख नक्षत्राच्या ज्योती/कोण कुणा शृंगारते*) स्वरूपाची आहे. 'उर्वरित' ही कविता प्रियेच्या जुन्या स्मृतीला उजाळा देणारी, प्रेमातील नैसर्गिक चेतनेचा सन्मान करणारी व प्रियेकडे विखार-विकाररहिततेने बघणाऱ्या निरामय दृष्टीची आहे. आपल्या अल्पाक्षरी शैलीत खूप काही सांगून जाणारी ही कविता रसिकाला कविगत अनुभवाचा पुन: प्रत्यय देते. प्रेमभावाच्या प्रलयाची चित्रमय व संवेदिक प्रतीती देणारी काजेंची ही शैली निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण म्हणावी लागेल.

'दशा', 'पडघम', 'नामसंकिर्तन', 'थांबवा हो', 'आस', 'ठेच', 'नमस्कार', 'दंडवत', 'अलिकडे', 'शहाण्यांनो', 'आम्ही दोघे', 'कधी?', 'खंगलेला गाव', 'जेथे गेलो तेथे' - या कवितांमधून सामाजिक जाणीव अविष्कृत होते. विषम व अन्यायग्रस्त सामाजिक वास्तव यामुळे व्यक्तिमनाची होणारी होरपळ व त्यामुळे येणारे दुभंगलेपणही या कवितेत जाणवते. काजेंच्या ठिकाणी रुजलेले पारंपरिक मूल्यसंस्कार व या शतकात होत गेलेले माणूसपणाचे अवमूल्यन या संदर्भात एक विदारक व करुणामय जाणीव त्यांच्यात नांदते. इथल्या सामान्य माणसाचे जीवन - *'उभा जन्म इथे / उस चरकात चोळामोळा'* अशा स्वरूपाचे आहे. हे खिन्न करणारे समाजवास्तव बदलेल असे वाटत नाही. - *'दुबळ्यांची तगमग आता येईल का फळा/उमलले सूर्यफूल कधी पाहिल आंधळा?'* (दशा, पृ.१)

विज्ञानाचे पडघम वाजले, हळूहळू जनसामान्यांपर्यंतही बरीच भौतिक सुखं पोहचली. त्यामुळे सार्वत्रिक विनाशाची जाण बळकट होऊ लागली आहे. या पश्चातापातून *'येईलही काळोखातून लख्ख कवडसा'* असा आशावाद कवीला बळ देत राहतो. भांडवलदारी साम्राज्यवादी मानसिकतेमुळे जे सत्तेचं राजकारण सुरू होऊन माणुसकीचा पायाच नष्ट झाल्याची खंत 'छंद' या कवितेत अविष्कृत झाली आहे. कवीची निराशा (*जडला मनास/निरर्थाचा छंद*) करुणेचं रूप घेते, अंतर्मुख करते. हुतात्म्यांची नावं घेऊन मतपेट्या भरणे, दुबळ्यांना झोपड्यांचे दान देऊन निवडूनयेणे व घोषणाबाजीला आलेला उत इ. आशय घटकांच्या द्वारे लोकशाहीला आलेल्या षंढ व कटू फळांचे 'नामसंकिर्तन' अंतर्मुख करणारे आहे. अस्त्रांचे ढिगारे वाढवून विषयुक्त वारे पसरविणारे वैज्ञानिक संत! खोट्या सहानुभूती दाखवणारे दांभिक, दुर्बोधाची पुरचुंडी बांधून विद्वत्ता पाखडणारे विद्वान, स्तुतिपाठकांचे हिरवे शेवाळ, धन-सन्मानात गुंग असणारे महाभाग इ. सर्व विपरिताविरुद्ध त्यांच्या मनात दु:ख भरून आहे. *'नाठाळाचे माथा/घालावया काठी/बळ देई ओठी/संतश्रेष्ठा'* असा आत्मसंवादही वास्तवाच्या पार्श्वभूमीवर खोटाच ठरतो. मानवता व सत्य गहाण पडून विषम वास्तव बलवत्तर झाल्याची खंत व विषमतेला - दु:खाला आलेली कोडगेपणाची रूपं अधिक दु:खकारक आहेत; आणि मग *'वाहावत जाणे/एवढेच हाती'* अशी निराशा दाटून येत असली तरी *'तोषोनिया कुणी/पुरवा हो आस/सामान्य माणूस/ सार्थकावा'* (आस, पृ. १९) अशी आस व करुणा अंत:करणात उचंबळत राहते.

'अलिकडे' व 'आम्ही' या कविता काजेंच्या काव्यशैलीची खास उदाहरणे म्हणता येतील. त्यातील सम-विषम लयीचे ताणेबाणे, अल्पाक्षरत्व, व शब्द-प्रतिमांची प्रत्ययकारी लय, अंतर्मनातून प्रक्षेपित होणारा भयकारी आशय चिंतनास बाध्य करतो. 'अलिकडे' ही कविता मर्ढेकरांच्या 'प्रेमाचे लव्हाळे' या कवितेत अविष्कृत झालेली, विज्ञानयुगाने निर्माण केलेली भयकारिता व अमानवीयतेची आठवण करून देते. - *'पत्रातून स्फोट/ यंत्रातून स्फोट/चित्रातून स्फोट/घातअपघात रगड'... 'सडलेल्या माशांच्या दुर्गंधीत/अलिकडे/संपूर्ण मानवताच/ विषारी वायूच्या मिठीत/चैतन्यहीन'* (अलिकडे, पृ.४३)

'आम्ही दोघे' या दीर्घ कवितेतील अस्तित्वधारी बाह्य मी व त्याच्या अंतरात्म्याचे - मानवी सत्वाचाच बळी गेल्याचे शल्य व निदान थोडेसे सुख किंवा प्राथमिक गरजाही पूर्ण न झाल्याचे वास्तव अजूनही स्वप्नवत

असल्याचा उपरोधिक सूर, शेवटी करुणेचे (*गारठ्याशिवाय गारठलेले घर*) रूप धारण करते. काजेंची सामाजिक जाणिवेची कविता समाजाची सामूहिक नेणीव ढवळून काढणारी आहे. तिच्यात समाजपरिवर्तन संबंधात विद्रोह असला तरी तो संयत आहे; त्यामुळे ती आत्मद्रोही बनत नाही. या कवितांमध्ये तुकाराम-मर्ढेकर-ढसाळ यांच्या शैलीसारखा थेटपणा आहे तो समाजाबद्दलच्या कणवेमुळेच.

निसर्गाचा अनियमितपणा व लहरीपणाच्या संदर्भात कारखानदार व भांडवलदारांपेक्षा शेतकरीच अधिक अभावग्रस्त होतो व सरकारी यंत्रणेकडूनही पुरेसं सहकार्य होत नाही. वाढत्या कुटुंबाची जबाबदारी, महागाई, व निसर्गचक्रात शेतकरी भरडून निघतो, अगतिक होतो, आत्महत्या करतो. म्हणून *'कधी न्हातील तान्हुले/सुवर्णाच्या घंगाळात'* हे त्याचे स्वप्न कधीच पूर्ण होत नाही. *'धन्य शेतकरी/रोज कडू घास/उरलासे श्वास/नाममात्र'* किंवा *'आज अन्नदाता/भिकेला लागला/खाऊन मातला/दलाल गा'* या ओळींमधील उपरोधिक सूर तरी काय दर्शवितो? म्हणून कवीने शेतकऱ्यास संघटित होण्याचे आवाहन करताना *'आदळता डोके/कधी फुटला दगड/संघशक्तीविना/कोणी जिंकलासे गड?'* असा अंतर्मुख करणारा प्रश्न उभा केला आहे. या दृष्टीने खालील ओळीतील आवाहन अधिक महत्त्वाचे वाटते. *'तुकोबा, जोतिबा/मनोभावे स्मरू/संघर्ष उभारू/श्रमिकांचा'* (संघर्ष, पृ.१२), *'गांजल्यांनो आता/पेटवा रे भूक/होवोनिया एक/विश्ववन्ही'* (विश्ववन्ही, पृ.१३), *'दिंडीने का मिळे/कापसाला भाव/घालावा तो घाव/मुळावरी'* (क्रांतीसाठी, पृ.१४)

काजेंनी निसर्गप्रतिमांचा अनेक ठिकाणी वापर केला आहे. पण त्या निसर्गकविता नाहीत. 'नाव' ही कविता तर वर वर निसर्गकविताच वाटते. पण त्यामागे आत्मकथनाचे सूत्र आहे. 'सूर्यान्वयी' या कवितेत वरवर सौंदर्यपूर्ण निसर्गचित्रे दिसत असली तरी त्यामागे अस्तित्व, सौंदर्य, व निसर्गाच्या स्थिती-गती-लयाचे तत्त्वचिंतन आहे. माणसाचे मरणभय अनादि आहे. ते दु:ख, भय हलके करण्यासाठी त्याने ईश्वर संकल्पनेला जन्म दिला. परंतु निसर्गतत्त्व शेवटी स्वीकारावेच लागते. दु:खाने किंवा आनंदाने सुद्धा! कवीने इथे निसर्गतत्त्व आनंदाने स्वीकारले आहे, *'मी हा काठ खुडून सरकत पुढे सूर्यान्वयी व्हावया'* अशी अनेकार्थ, अधिकार्थ क्षमता त्यांच्या कवितेत अनेक ठिकाणी दिसते.

'लाजाळू' ही या संग्रहातील एकमेव निसर्गकविता म्हणता येईल. बालकवींच्या 'औदुंबर' कवितेची स्मृती त्यातील निसर्गचैतन्याने व वर्णनाने जागी होते. *'कुण्या एका थंड प्रदेशातील खेड्यातली ही सकाळ/आभाळात श्रांत निळाई/आसवांच्या ओलाव्याने पाझरणारे अंगाई गीत/नि:शब्दतेत गगनाला भिडणारी सुरूची उंच उंच झाडं, दूर देवळात मंद मंद लवलवणारी दीपमाळा, रानातून परतणाऱ्या हिर्व्या पोपटांचे थवे, डोळे उघडे ठेवून - पाय दुमडून निवांत बसलेलं कुत्रं'* हे सर्व चैतन्यमय निसर्गसौंदर्य ते एखाद्या कुशल चित्रकाराप्रमाणे शब्दबद्ध करतात. त्यांच्या 'नभ अंकुरले' या पहिल्या संग्रहातही अनेक निसर्गकविता चित्तवेधक उतरल्या आहेत. खरे तर त्यांच्याकडून अशा अधिक कवितांची अपेक्षा होती. निसर्गातील चैतन्य, त्यात आंदोलित होणारी मानवी भाव-भावनांची रूपे बालकवीप्रमाणे इथेही चैतन्यमय, आनंदमय होऊन जातात. 'त्यातील निसर्गविषयक जाणीव व नाजुक शब्दकळा पाहून आनंद झाल्याची' नोंद कुसुमावती देशपांडे यांनी केली आहे.

'सदानंद रेगे' ही व्यक्तिचित्रणात्मक कविता या संग्रहात आहे. तसेच काव्यनिर्मितीतील जटिलता व निसरडेपण अधोरेखित करणारी कविताही एकमेवच म्हणावी लागेल. *'आशयाचा ताणाबाणा/असावा अनवट/वाटा भलेही असोत/निसरड्या... बिकट/किंचित/हलते झुलते/माथ्यावर टांगलेले/बिलोरी झुंबर/कल्पिताकल्पितातून/डोकावणारे दिवाभीत/अनोखे मनमीत'* (कविता, पृ.४०)

'अर्थ', 'निरभ्र', 'मोती', 'त्रिवेणी माऊली' व 'देवतारा-एक स्मरण' या कवितांमधील चिंतन दर्शनाच्या पातळीवर उतरलेले जाणवते. 'अर्थ' या कवितेचा मूलाधार (मानवी जगण्याच्या संदर्भात) उत्पत्ती आणि लय-पतनाचे अनादि सूत्र अधोरेखित करणे हे आहे. एका बाजूला देहनिष्ठ जाणिवेला व्यापून असलेले मन, तर दुसरीकडे तृष्णेने देहाला कुरतडणारे मन, शब्दातून उगम पावणारे अर्थ आणि निरर्थ (*ओंजळीत अर्थ/अर्थ/पतंग ना सुरवंट*) आणि यांमधल्या पोकळीमधले जीवनवास्तव म्हणजे तर शेवटी जीवन नाही! 'निरभ्र' या कवितेत प्रियेशी संवाद आहे. म्हटले तर ही प्रेमकविता. यातील प्रियकर जगरहाटीकडे / जगण्याकडे स्थितप्रज्ञ वृत्तीने बघतो. हव्याहव्याशा वाटणाऱ्या देहमनाच्या काही तृष्णा मनात जरी साठवून ठेवल्या तरी नियती आपले काम आपल्याच पद्धतीने करत राहते. आपल्या कितीतरी इच्छा, आकांक्षा आयुष्यभर अपूर्णच राहतात. म्हणून व्यक्तीची अगतिकता आणि नियतीचा खेळ यात आहे. तो क्षण भरभरून जगण्याशिवाय पर्याय तरी कुठे आहे! *'खोल विश्वासाने/झंकारली विणा/गंध गेला राना/मृगनाभी'* (मोती, पृ.२९) हा खोल नि:श्वास सुखद अनुभूतीचा आहे. पण या चैतन्यमय अनुभूतीची अनेकार्थता मात्र रसिक सापेक्षच असेल. 'त्रिवेणी माऊली' ही दीर्घ कथात्म कविता देखील

जीवनदर्शनाच्या पातळीवर उतरल्याचे जाणवते. *'जरी तीन देही/भिन्न रेखा दीप्ती/एक मातृशक्ती/सर्वव्यापी'* हे सूत्रच या कवितेच्या मुळाशी झुळझुळताना दिसते. 'देवतारा : एक स्मरण' ही कविता म्हणजे कवी आरती प्रभूंना वाहिलेली श्रद्धांजली आहे. आरती प्रभू हे शैलीदृष्ट्या काजेंना जवळचे असणारे कवी. त्यांचा वैयक्तिकदृष्ट्याही त्यांच्याशी संबंध होता. 'नभ अंकुरले' चे प्रकाशन झाले तेव्हा ते त्यांना त्यांच्या कुडाळ गावी घेऊन गेले होते.

काजेंच्या आत्मनिष्ठ कवितांचा प्रवास, सामाजिक आशयाच्या कवितांना प्राप्त झालेलं सार्वत्रिक आवाहन-संप्रेषणाचं बळ, मृत्यूकडेही सूर्यान्वयी होण्याच्या दृष्टीने पाहणारी निरामयता व जगण्याकडे - जीवनव्यवहाराकडे दार्शनिकाच्या प्रज्ञा-प्रतिभेने पाहणारी त्यांची विधायक दृष्टी आधीच्या दोन कवितासंग्रहांच्या पुढचा टप्पा निश्चित करते.

काजेंची प्रतिमानिर्मिती कातीव, कोरीव आहे. त्यांच्या एकंदरित काव्यरूपावर तुकाराम-मर्ढेकरांच्या शैलीचा प्रभाव असला तरी त्यांच्या प्रतिमा-शब्दांच्या बांधणीला स्वत:च्या शैलीरूपाची नाममुद्रा प्राप्त झाली आहे. त्यांनी आपल्या काव्यविषयक चिंतनमननातून स्वत:चे शब्द - प्रतिमामान विकसित केले आहे. सुभाष सावरकर म्हणतात, 'आरती प्रभू, चित्रे, ग्रेसपेक्षाही त्यांची प्रतिमांची जाण अधिक सक्षम आहे.' जाणीव-नेणिवेच्या मुशीतून जे मूर्त-अमूर्ताच्या सरमिसळीचे काव्यरूप तरळून वर येतं ते चैतन्यमय व सौंदर्यपूर्ण असते. त्यादृष्टीने काळविवराने गिळलेला क्षण, फुलकेशरात भैरवीचा सूर, उदबत्तीच्या धुरावर तोललेले हुंदके, गारठ्याशिवाय गारठलेलं घर, मोराच्या मणक्यात ठणकणारा डोळा, जंगलझडीत लामणदिवा, तुळसगंधी अंधार, स्वर पांगळ्या पाकोळ्या, पंख मिटलेला प्रहर, तसेच - कातीन, पतंग, सुरवंट, पाकोळ्या इ. प्रतिमा पाहण्यासारख्या आहेत. काही रचना जाणिवेच्या पातळीवर असल्या तरी जाणीव-नेणीव संमिश्र व नेणिवेच्या स्तरालाही काही रचना स्पर्श करतात. गोमटा किरण, दवंहिरवा घाट, तांबडे आभाळ, काळी घागर, भगवे स्वर, शुभ्र नाव, पिवळा आजार इ. रंगछटा व आसपास *सामसूम/पड्याल तिकडे/कुठे कुठे धडामधूम/भाळ फुटलेले आभाळ/गारठला गर्भभाव/सुसाट गोळ्यांचे पिसाट वादळ* इ. नादलयी व समविषम प्रतिमांचे ताणेबाणे यामुळे झालेली चित्रमय लयाची निर्मिती मोठीच मोहक व प्रत्ययकारी वाटते. कवितेच्या अस्तित्वाच्या संदर्भात दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते काही ठिकाणी संत साहित्यातील पारंपरिक लयीची सांधेजोड आपल्या काव्यगत कल्पिताशी करतात तेव्हा त्यातून निर्माण झालेली समविषम लय व नेमके शब्दभान अर्थ ध्वनित होणारी चैतन्यमय झळाळी त्या रचनेला प्राप्त होते. जसे *'नामसंकिर्तन/साधन पै सोपे/काय श्रेष्ठीकृपे/शक्य नोहे'*; *'झाडे जाती/तेथे लव्हाळे राहती/श्वासनिश्वासाच्या/लयी वेल्हाळती'*.

मुक्तछंद, अष्टाक्षरी छंद, अभंग व अभंगासारख्याच कमीअधिक शब्दसंख्या व चरणसंख्येच्या लयीचेही प्रयोग त्यांच्या कवितेत आहेत. पूर्वी 'नभंग' या नावानेही त्यांनी अभंगरचना केली होती.

सामान्य माणूस हा तुळशीराम काजे यांच्या कवितेचा केंद्रबिंदू आहे. या कवितेची कलात्मक बाजू भक्कम आहे व मूल्यात्म आवाहन - संप्रेषणाची सिद्धी या कवितेला प्राप्त झाल्यामुळे ती खऱ्या अर्थाने जननिष्ठ जाणिवेची कविता आहे. या कवितेचे अंतरंग जनकळवळ्याने भारलेलं असल्यामुळे ती मर्ढेकर, अनिल, व मुक्तिबोधांची परंपरा पुढे नेणारी कविता आहे. त्यांच्या पुढील निर्मितीस शुभेच्छा!

---

काहूरभैरवी (कवितासंग्रह), तुळशीराम काजे, काजे प्रकाशन, श्री टाक यांच्या घराजवळ, राजा पेठ, अमरावती, पृ. ८०, मूल्य १०० रू.

## साभार पोच

**कादंबरी**

**चाळेगत** - प्रवीण दशरथ बांदेकर, २००९, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, , पृ. ३४८, मूल्य ३२५ रु.

**कवितासंग्रह**

**आभाळ** - प्रा.रामदास बिर्जे, २००९, निर्मिती विचार मंच, नेर्ली - तामगाव रोड, उजळाईवाडी, ता.करवीर, जि. कोल्हापूर, पृ. ५६, मूल्य ४० रु.

**अस्तित्व शोधताना**, रुपेशकुमार जावळे, २००९, प्रतिभास प्रकाशन, तारांगण, परतानी हॉस्पिटलसमोर, बसस्थानक परिसर, परभणी, ४३१ ४०१, पृ. ७९ मूल्य ८० रु.